# समर्थ रामदास

**प्रश्न –** समर्थ संप्रदायाचे स्वरूप व कार्य सांगा ?

→ **प्रस्तावना –**

समर्थ संप्रदायाचे प्रवर्तन रामदासांनी केली. श्रीराम आणि हनुमान समर्थ संप्रदायाची उपास्य दैवत होते. हनुमान हा बल आसलेला प्रतीक होय. राम हा सर धनुर्धारी होता. रामदासांनी सर्वत्र भ्रमण करून समर्थ संप्रदायाची विचारश्रेणी लोकांना पटवून दिली. एकंदरीत रामदास हेच खरे प्रबोधनकार होते. रामदास हे पाच संतापैकी शेवटचे संत. इतर संतांनी अध्यात्मवादाची शिकवण दिली पण रामदासांनी अध्यात्माबरोबरच प्रयत्नवादाची शिकवण दिली. प्रयत्नवादाची कास धरायला रामदासांनी सांगितली.

समर्थ रामदासांनी विविध ठिकाणी मारुतीची स्थापना केली. रामनवमीचा पहिला उत्सवही त्यांनी साजरा केला (इ.स. 1567) श्री चाफळला श्रीरामाचे मंदिर उभारले. हे सर्व करीत असताना समर्थ चाफळास वा अन्य कोणत्याही मठात स्थिर राहिले नाहीत. त्यांची भ्रमंती सतत चालू होती. त्याकाळात मुसलमानी हल्ल्यांचे संकट सर्वत्र जाणवत होते. केव्हा कोणावरही संकट येईल, अशा काळात समर्थांनी गावोगावी हनुमान मंदिराची स्थापना केली. गावोगावी मारुती स्थापना केली. राजकारण, व्यवहारकारण करत असताना सर्व भगवंताचे अधिष्ठान असले पाहिजे असे रामदासांना वाटत होते.

Scanned with CamScanner

★ जीवन चरित्र :-

संसार करावा नेटका मग परमार्थ साधेल नेटका अशी शिकवण देणाऱ्या समर्थ रामदासांचा जन्म इ.स. 1608 मध्ये जांब या खेड्यात झाला. रामदासांचे मूळ नाव नारायण असे होते. सूर्याजीपंत व राणूबाई हे समर्थांचे माता-पिता होत. सूर्याची व रामाची उपासना त्यांच्या घराण्यात आठ पिढ्यांपासून चालत आलेली होती. रामदास आठ वर्षे असतानाच त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. एकदा विचारात गढून असताना राणू कोपऱ्यात राणूबाईंना रामदास सापडला. काय करतोस रे नारायणा? असा प्रश्न तिने केला. चिंता करितो विश्वाची असे ~~प्रश्न~~ नारायणाच्या मुखातून निघाले. हा ~~बारा~~ वर्षांचा वय असेल असेल असे आपल्या मुलाचे वाक्य मातेला ऐकून काय वाटले असेल. समर्थांनी सतत बारा वर्षे तीर्थाटन केले. वयाच्या आठव्या वर्षीच रामदासांनी रामाच्या देवळात रामोपासना केली. ~~असाच~~ शके 1603 म्हणजेच 1681 मध्ये रामदासांचा मृत्यू झाला.

★ समर्थ संप्रदायाचे स्वरूप-

1) प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालणारा संप्रदाय-

नेटका प्रपंच केल्याशिवाय परमार्थ साधणे अशक्य आहे असे रामदासांनी सांगितले. संसार व्यवस्थित असेल तरच परमार्थाची प्राप्ती होईल असा संदेश हा संप्रदाय देतो.

★ गाडीला दोन्ही चाकांची आवश्यकता

★ संसार सुखी तर प्रपंच व परमार्थाची आवश्यकता

Scanned with CamScanner

* प्रभु रामचंद्र हे समर्थांचे सद्गुरु होते. दुसरे कोणी मानवी गुरु त्यांना नव्हते → प्रो. गोसावी.

3

परमार्थ आणि प्रपंच यात या संप्रदायाने प्रयत्नवादाचा पुरस्कार केला. प्रयत्नवादाचे तत्त्वज्ञान या संप्रदायाने सामान्यातील सामान्य माणसापर्यंत पोहचविले. केवळ परमार्थ किंवा केवळ संसार करुन चालणार नाही तर, या दोन्हीतील योग्य मनुष्याला करता आले पाहिजे असे शिकवण समर्थ संप्रदायाने दिली.

## 2) मठाची स्थापना व महंताची नेमणूक – (मठाला महत्व देणारा संप्रदाय) –

प्रत्येक गावामध्ये रामदासांनी मठाची स्थापना केली / होती. ही समर्थांची जन्मभूमी तर, चाफळ ही कर्मभूमी आणि सज्जनगड हे त्यांचे समाधिस्थान म्हणून या तिन्ही मठांचे मठाधिपती स्वतः समर्थ होते. ह्या काळात सामाजिक, धार्मिक परिस्थिती बिघडलेली होती. अशा काळात वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन समर्थ संप्रदायाने केले. लोकांमधला आळस दूर करुन त्यांना योग्य दिशा दिली. रामदासांनी गावोगावी मठाची स्थापना करुन प्रत्येक मठावर एका विद्वान महंताची नेमणूक केली. यावरुन रामदास द्रष्टे किती कल्पक होते हे आपल्याला दिसून येते. राष्ट्रहित विस्कळीत समाजाला मठाच्या माध्यमातून रामदासांनी समर्थ केले.

(महंतांनी महंत करावे / गावोगावी मठ स्थापन करुन शिकवण द्यावी) → हे त्यांचे मुख्य धोरण होते.

मुख्य महत्वाची ... हे या संप्रदायाचे गुरु महत्वाचे शिष्य होय. ११०० मठांची स्थापना महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर मठात कामाची वाटणी करुन दिली ओळून

## 3) प्रयत्नवादाचा पुरस्कार करणारा संप्रदाय –

रामदास हे प्रवृत्तीवादी व क्रियाशील संत होते. रामदास हे इतर संतांपेक्षा लोकांना वेगळे शिक्षण देत. ईश्वरभक्तीत तल्लीन होऊन मोक्षप्राप्ती

केवळ ज्ञानी हे या संप्रदायाला मान्य नाही. केवळ भक्तीलाही या संप्रदायात स्थान नाही. कर्मयोग हेच आहे हे आणि कोणी पाहिले? असेही शिकवण दिली. किंवा असा संदेश रामदासांनी दिला. अध्यात्माबरोबरच प्रयत्नवादाची कास धरायला या संप्रदायाने सांगितले हेच समर्थ संप्रदायाचे इतर संप्रदायापेक्षा असलेले वेगळेपण होय. प्रयत्नवादाची शिकवण हेच त्यांच्या वाङ्मयाचे खास विशेष होय.

४) समाजकारण, राजकारण, व्यवहारकारण यांची मेळ घालणारा संप्रदाय—

ज्ञान, कर्म, भक्ती समन्वय सांगणाऱ्या या संप्रदायात व्यवहार, राजकारणाला विलक्षण असे महत्त्व होते. व्यवहार, राजकारण करत असताना तेथे भगवंताचे अधिष्ठान असले पाहिजे अशी अपेक्षा या संप्रदायाने केली. केवळ अध्यात्माची ओढ या संप्रदायाने दिली नाही तर गुरु कसा असावा, लोक कसे असावेत, जीवन कसे जगावे. राजकारण कसे करावे. तसेच धर्म म्हणजे काय. कर्म म्हणजे काय अशा अनेक विविध विषयाची माहिती या संप्रदायाने करून दिली. ६) लोक उपासनेला महत्त्व दिले

५) हिंदूंची अस्मिता जागृत करणारा संप्रदाय—

रामदासांच्या काळात समाज अस्मानी सुलतानीच्या कचाट्यात सापडलेला होता. त्यामुळे समाज हा मोठ्या प्रमाणात मरगळलेला झाला होता. समाजात संवेदना स्फूर्ती देणारी भावना निर्माण झाली होती. अशा अवस्थेत समाजाला जागृत करण्याची आवश्यकता होती आणि ते काम या

इस्लामी सुलतानांच्या काळात. हिंदूधर्म व संस्कृती कोपामुळे समाज विखंडलेला होता

संप्रदायानी केले. आपल्या वाङ्मयातून, शिकवणुकीतून रामदासांनी हिंदूंच्या अस्मितेला जागृत करण्याचा प्रयत्न केला. शिवाय प्रत्येकाने मठाच्या समाजातील आळस व दौर्बल्य दूर केले. मारुतीची उपासना करून बलोपासनेचा पुरस्कार या संप्रदायाने केला. हिंदूंच्या भक्तीची आसना करणाऱ्या या संप्रदायाने बाह्य कर्माला अधिक महत्त्व दिले. (विभूती पूजेला महत्त्व देणारा संप्रदाय)

## * समर्थ संप्रदायाचे कार्य –

1) हिंदूंची अस्मिता जागृत केली

2) मठांची स्थापना व महंतांची नेमणूक

3) प्रपंच विज्ञानाचे धडे दिले –

तत्कालीन समाज हा अज्ञानाच्या अंधारात सापडलेला होता. त्यात कसे वागावे, संसार कसा करावा हे त्यांना कळत नव्हते. कारण प्रपंचाच्या अधिष्ठानाशिवाय परमार्थ टिकणे शक्य नाही याची जाणीव रामदासांना आली होती. म्हणून अशा चुकलेल्या माणसाला मार्गदर्शन करणे ही त्या काळाची गरज होती. हे जाणूनच ओळखूनच रामदासांनी प्रयत्नवादाचे तत्त्वज्ञान निर्माण करून सामान्यातल्या सामान्य लोकांपुढे ठेवले. आणि प्रपंचविज्ञान इत्यादी साध्या, सोप्या आणि सरळ भाषेत सांगून त्यांच्यात पराक्रमाची, पुरुषार्थाची महत्त्वाकांक्षा निर्माण केली. त्यामुळे परंपरेने

दृढ झालेले जनमानसातील ~~औ~~ उदासीनता कमी होऊन महाराष्ट्रात पराक्रमाचे, पुरुषार्थाचे वारे खेळत राहिले. परमार्थाइतकेच राजकारणाचे महत्त्व पटवून देणारे रामदास हे पहिले संत ठरतात.

४) समन्वयता

५) राजकारणाचे महत्त्व

(समर्थांच्या कार्यामुळे, व्यक्तित्वामुळे आणि पारमार्थिक अधिकारामुळे, तत्कालीन पारमार्थिक क्षेत्रातले तुकारामांसारखे श्रेष्ठ संत-पुरुष आणि शिवाजी महाराज, रामचंद्र अमात्यांसारखे राजकारणधुरंधर पुरुष भारावून गेले होते यात नवल नाही. कारण, त्यांनी समर्थांना प्रत्यक्ष जवळून पाहिले होते.)

प्रश्न - समर्थ रामदासांनी केलेल्या वाङ्मयीन कामगिरीचा आढावा घ्या.

## * रामदासांचे वाङ्मय -

* मनाचे श्लोक - रामदासांच्या वाङ्मयाचा अभ्यास केल्यास यातून रामदासांची लोकशिक्षकाची भूमिका स्पष्ट होते. कारण तत्कालीन समाज हा 'अस्मानी सुलतानी' च्या कचाट्यात सापडलेला होता. अशी वेळी समाजासमोर भक्ती, ज्ञान, वैराग्य, नीती यांचे प्रतिपादन करण्यासाठी रामदासांनी आपले लेखन केले.

### * मनाचे श्लोक →

समाजास बोध करणे हे समर्थांच्या मनाच्या श्लोकाचे स्वरूप आहे. श्लोकातून रामदासांनी स्वतःच्या मनाशी संवाद केला. कारण मन हे चंचल आहे. यावर ताबा ठेवणे आवश्यक आहे (कोहिनार, शिस्त) मनाचे श्लोक रामदासांनी भुजंगप्रयात वृत्तात लिहिले. या श्लोकांची संख्या 205 इतकी आहे.

मनाच्या विचाराप्रमाणे कृती घडत असते म्हणून रामदासांनी मनास बोध केला.

'मना सज्जना भक्तिपंथेचि जावे'

हा रामदासांचा पहिलाच श्लोक वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. भिक्षा मागत असताना घरासमोर, बोलून श्लोक म्हणत म्हणावे यातून त्यांना उपदेश होईल. या उद्देशानेच रामदासांनी श्लोकांची रचना केली.

'जगी सर्व सुखी असा कोण आहे
विचारी मना तू शोधून पाहे'

व्यवहार करत असताना शरीराकडून अनेक क्रिया होत असतात. क्रिया २ कोणत्या क्रिया शरीराकडून होत असल्या तरी त्याचे मूळ

Scanned with CamScanner

मनात आहे. म्हणून रामदास मनाला बो-करताना दिसतात.

**सारांश –**

रामदासांनी मनाच्या श्लोकात मनाशी संवाद करताना बाह्य ही केवळ ईश्वरसाक्षीने सख्य स्वरूप असे चिंतन म्हणजे रामदासांचे 'मनाचे श्लोक' होत. म्हणून ते मनाला चंदनाप्रमाणे झिजायला सांगतात. जगात कोणीही सुखी नाही म्हणून रामदास मनाला श्रीरामाचे चिंतन करण्यास सांगतात. एकंदरीत जीवनाचे मौलिक चिंतन म्हणजे रामदासांचे 'मनाचे श्लोक' होत.

*** दासबोध →**

रामदासांचे दासबोध हे काव्य नसून एक विचाराचे भांडार आहे. या ग्रंथाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग पडतात. रामदासांनी उपदेशाच्या हेतूने लिहिलेला हा ग्रंथराज सत्तावीस वर्षांनी 1681 मध्ये पूर्ण केला. पूर्वार्धात ज्ञान, भक्ती, परमार्थ व प्रपंच कसे करावे याबद्दल रामदासांनी उपदेश केला. तर उत्तरार्धात शिक्षणाबद्दल किंवा व्यवहारकारण, राजकारण कसे करावे याबद्दल माहिती सांगितली.

'प्रपंच करावा नेटका मग परमार्थ साधावा विवेका'

असे दासांनी दासबोधात विवेचन करताना सांगितले. सांप्रदायिक प्रमाणग्रंथ म्हणून मान्यता पावलेला हा ग्रंथ समर्थांची खरीखुरी वाङ्मयीन मूर्ती होय. रामदासांच्या वाङ्मय निर्मिती मागील मुख्य प्रेरणा ही उपदेशाची आहे. अशा दासबोधाचे वाङ्मयीन विशेष पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) विचारसौंदर्य –

रामदासांचे दासबोध हा एक विचारांचे भांडार म्हणून ओळखले जाते. कारण जे काही आपल्याला माहित आहे ते दुसऱ्यांना सांगितले पाहिजे असे रामदासांना वाटते. जीवन कसे जगावे, आदर्श जीवन म्हणजे नेमके कोणते जीवन अशा अनेक विषयावर रामदासांनी विवेचन केले. संतांना कधीच, पण असाच विविध विषयावर दासांनी चर्चा केली. म्हणून दासबोधात रामदासांचे विचारधन एकवटलेले आहे असे म्हटले जाते.

२) प्रचारकीचे स्वरूप –

प्रतिपादनाच्या रामदासांचे संपूर्ण वाङ्मयच प्रचारकांच्या भूमिकेतून निर्माण झाले. म्हणून विचारांचे प्रतिपादन हे सुद्धा दासबोधाचे एक विशेष म्हणून आपल्याला नोंदवता येईल. समाजात जागृती घडवून आणण्यासाठी दासांनी या ग्रंथाची रचना केली. म्हणून रामदास हे प्रबोधनकार म्हणून ओळखले जातात.

गोष्टींच्या परिसराची उलगडा लावण्याचे (ग्रहमल) कार्य कसे मनाकडे असते हे अजयाचे आज्ञा दासांनी केले

३) परखडपणा –

परखडपणामुळेच रामदास हे इतर संतांपेक्षा वेगळे वाटतात. उद्धटाशी उद्धट-पणानेच वागले पाहिजे. असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. रामदासांच्या दासबोधात कुजनसाला थारा नाही. 'वाचाळासी वाचाळ वागावे'

रामदासांना ढिलेपणाची अत्यंत चीड आहे. त्यामुळे त्यांनी समाजाला कीर्तनाची शिक्षण दिली.

* भक्तिमार्गाविषयीही रामदासांनी दासबोधात बोध केला. कैवल्य भाविकपणाने केलेल्या नामस्मरणाने भक्तिमार्ग साधता नाही नवविधा भक्तीचा समावेश दासबोधात झालेला आहे.

5) भक्तीचे प्रतिपादन -

वारकरी संप्रदायाच्या प्रारंभकाळापासून अनेक संतांनी प्रपंचाला स्थान नसणाऱ्या भक्तीची शिकवण समाजाला दिली. परंतु रामदासांनी आपल्या दासबोधातून भक्तिविषयक नव्या दृष्टिकोनाचा विचार केला. प्रपंचाशिवाय परमार्थाकडे वळू नये असे रामदासांचे मत आहे.

सारांश -

रामदासांचा 'दासबोध' हा ग्रंथ समाजप्रबोधनाच्या प्रेरणेतून निर्माण झाला. जनजागृतीच्या दृष्टिकोनातून पाहिले तर हा ग्रंथ अतिशय महत्वाचा आहे. या ग्रंथातून लोकविषयक तत्वांचे प्रतिपादन रामदासांनी केले म्हणून तत्वप्रतिपादन सुभाषिते (रसिक) असे हे सुद्धा दासबोधाचे एक वाङ्मयीन विशेष म्हणून सांगता येतील. म्हणून रामदासांचा 'दासबोध' हा ग्रंथ काव्यग्रंथ नसून एक विचारांचे भांडारच होय, असे आपल्याला म्हणता येईल. रामदासांच्या दासबोध या प्रमाण ग्रंथात अनेक वाङ्मयीन विशेष असलेले दिसून येतात.

प्रश्न - करुणाष्टकातून रामदासांच्या भक्तमनातील आर्तता कशी व्यक्त झाली आहे ते सांगा (मार्च/एप्रिल 200५-५(ब))

किंवा

समर्थ रामदासांच्या करुणाष्टकातून प्रकट झालेली आर्तता आणि तात्विकता यांचा परामर्श घ्या?

संत मलिकेत समाविष्ट होणारे परंतु स्वतंत्र असा संप्रदाय निर्माण करणारे समर्थ रामदास विपुल प्रमाणात साहित्याची निर्मिती केली. जसे तुकाराम व रामदासाचे नामदेवाचे दैवत विठ्ठल तसे रामदासाचे दैवत हे श्रीराम होते. करुणाष्टकात रामदासांनी श्रीरामाची करुणा भाकली. समर्थ, राघव, रघुनाथ, रघुवीर, अनाथबंधु, रामराया, कोदंडधारी, स्वामी, देवाधिदेव अशा अनेक विशेषनामी रामदासांनी करुणाष्टकातून रामास आळविले. काही आष्टकात श्रीरामाच्या मूर्तीचे वर्णन दासांनी करुणाष्टकात केले.

करुणाष्टकाची निर्मिती ही रामदासांच्या सुरुवातीच्या काळात झाली आहे. असे समिक्षकांचे मत आहे. रामदास जेव्हा नाशिक जिल्ह्यातील टाकळी येथे वास्तव्य करीत होते. तेव्हा त्यांना अनेक संकटांना, दुःखांना सामोरे जावे लागले होते अशा परिस्थितीत रामदासांनी करुणाष्टकांची रचना केली.

* करुणाष्टके म्हणजे काय?

" परमेश्वराची करुणा भाकणारी कविता म्हणजे करुणाष्टके होत "

" करुणा भावाने रामास आळविलेले आर्त भाव म्हणजे करुणाष्टक होय "

" करुणा भाव व्यक्त करणारी अष्टके म्हणजेच करुणाष्टके होत "

" करुणा भावाने रामास आळवलेली आठ श्लोकांची रचना म्हणजे करुणाष्टक होय ".

काव्य म्हणजे करुणाष्टक " करुणयाने ओथंबलेल्या उत्कटतेने अभिव्यक्त होणारे

* रामदासांनी श्रीरामास ... करुणाष्टक म्हणजे करुणाष्टक ...

नावाप्रमाणेच रामदासांची आर्तके करुणाष्टकाने ओथंबलेली आहेत. रामदास आपले उरकणे खोटे आहे म्हणून रामाचे दर्शन होत नाही असे ते म्हणतात. आपण कोठेतरी चुकलो म्हणून राम आपल्यापासून दुरावला आहे.

'नेटके लिहिता येईना
वाचिता चुकतो सदा
अर्थ तो सांगता येईना
बुद्धी दे रघुनायका'

आपल्याजवळ भक्ती नाही, ज्ञान नाही लिहिता येत नाही, वाचता येत नाही. वाचलेला कळत नाही म्हणून आता रघुनाथा तूच आता बुद्धी दे. अशी मागणी रामदासांनी श्रीरामाकडे केली.

श्रीरामांची आपल्यावर कृपा होत नाही. मनात वासना थैमान घालत होते. मी तुझ्या भक्तीत कमी पडलो मी तुझा दास म्हणविलो पण माझ्यात कोणतेच गुण नाहीत. यामुळच रामदासांना पश्चाताप होतो.

'अचपळ मन माझे नावरे आवरिता
तुजविण शीण होतो धाव रे धाव आता'

अशा या मनाच्या विदळ अवस्थेत धीर देण्यासाठी रामदासांनी श्रीरामांनी आपल्याला भेटावे म्हणून विनंती केली.

सारांश –

रामाला भेटण्यासाठी आतुर रामदासांच्या मनाची झालेली अवस्था आर्तकातून पाहावयास मिळते. करुणाष्टकात दुःख, वेदना, भावना, अगतिकता, अनुताप या भावना मिसळलेल्या आहेत. करुणाष्टकात रामदास आणि श्रीराम हे दोनच पात्र आहेत. श्रीराम हाच रामदासांचा एकमेव आधार आहे. श्रीरामाने आपणास भेट नाही दिली तरी शेवटी आपण त्याचेच आहोत आणि तो आपला आहे हा भाव रामदासांनी करुणाष्टकात कायम ठेवला.

Scanned with CamScanner

## * वेणाबाई →

कोल्हापूर येथील देशपांडे आडनावाच्या (देशस्थ) ब्राम्हण कुळात वेणाबाईचा जन्म झाला. मिरज येथील एका गृहस्थाशी तिचा विवाह झाला. वेणाबाई ही रामदासकालीन कवयित्री. मिरजेसही रहात असताना, समर्थ रामदास वेणाबाईच्या दारासमोर आले आणि त्यांची पहिली भेट. वेणाबाईंची ग्रंथरचना मर्यादित स्वरूपाची आहे. 'सीतास्वयंवर' 'रामायण' या दोन ग्रंथांची रचना वेणाबाईंनी केली. 'सीतास्वयंवर' हा वेणाबाईचा नावाजलेला ग्रंथ आहे. आख्यानपर काव्यग्रंथ आहे. रघुनाथी भागवत हा तिच्या वाचण्यात नित्याने येणारा ग्रंथ.

वेणाबाईंच्या मनात समर्थांविषयी नितांत भक्ती निर्माण झाली. आणि समर्थांनी तिला मंत्रोपदेश दिला. समर्थांच्या मठातील विविध कामे शिष्यांवर सोपवलेली होती. वेणाबाईकडे अक्षराचे काम होते. रघुनाथी भागवत महाभारत, रामायणादी ग्रंथांचे अध्ययन वेणाबाईंनी केले. वेणाबाईंनी आरत्या, पदे व काही अभंगांची रचना केली. शिवाय समर्थांची स्वानुभवी शिष्या सज्जनगडावर समाधिस्त झाली.


* संदर्भ-

1) श्रीसमर्थ आणि समर्थ संप्रदाय → र. रा. गोसावी.
2) समर्थ रामदास एक अभ्यास → य. दि. पेंढरकर.
3) समर्थ दर्शन
4) म.सा.इ. ~~खंड~~ संपादक खंड 5 → संपादक रा. श्री. जोग.
5) करुणाष्टके → संपा. सुहासिनी इर्लेकर.
6) 'करुणाष्टका' तीन करुणेचे मूळ नेमके कशात? → प्रा. डॉ. यशवंत साधु ('नवभारत' - जून 2002)